# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – ४११०१८

# आरोग्य मुख्य कार्यालय

---

## मॅन्युअल क्र.१७

## इतर उपयोगी माहीती

इतर माहिती

आरोग्य मुख्य कार्यालयाची इतर माहिती

1. म.न.पा.तर्फे छोटया वाहना मार्फत (TATA ACE HOPPERS AND WHEELER RICKSHAW H3 ) अ,ब,क,ड,इ,फ,ग व ह प्रभागा मधील घरोघरचा कचरा गोळा करण्यात येतो.
2. पिंपरी चिंचवड महानगरपालिका शहरातील कचरा वाहतुकीसाठी कॉम्फॅक्टर, डंपर प्लेसर /ड्युअल डंपर प्लेसर, ट्रक व खाजगी ठेकेदाराचे ट्रक वाहनां मार्फत कचरा वाहतूकीचे काम करणेत येते
3. रस्ते साफसफाई (यांत्रिकी पध्दतीने) मोठे व लहान रोडस्वीपर मार्फत करण्यात येते.
4. मैला टँकर (सक्शन युनिट) मार्फत म.न.पा. व खाजगी सेफ्टीं टँक साफसफाईचे काम करण्यात येते.
5. मलजेटि मशिनने सार्वजनिक मुता-या प्रेशरने साफ सफाईचे काम करण्यात येते.
6. टॉयलेट व्हॅन ने आण करण्यासाठी ट्रॅक्टर वाहनाचा वापर करणेत येतो.

उपरोक्त अ.क्र.१ ते ६ मधील वाहने अ,ब,क,ड,इ,फ,ग व ह प्रभाग स्तरावर आरोग्यविषयक कामासाठी कार्यरत आहेत.

7. हॉटेलवेस्ट स्वतंत्रपणे गोळा करणेसाठी वाहने कार्यरत आहे.
8. भाजीमडंई वेस्ट स्वतंत्रपणे गोळा करुन त्यावर खत प्रकल्प राबविणेत येत आहे.
9. शहरात रोज कचरा निर्माण होतो तो रोज उचलून विल्हेवाट लावणे कामी मोशी कचरा डेपो येथे वाहतूक करण्यात येते.
10. या कचरा-यावर १. गांडुळखत प्रकल्प , २.मॅकेनिकल कंपोस्ट, ३.शास्त्रीय पध्दतीने भु-भरण करणे, ४.प्लास्टीक पासुन इंधन निर्मिती प्रकल्प राबविण्यात येतात त्यावर पर्यावरण विभागाचे नियंत्रण आहे.
11. शहरातील रस्ते व उघडी गटरे याची साफसफाई करण्यात येते. सार्वजनिक संडास, सार्वजनिक मुता-या यांची साफसफाई करण्यात येते.
12. शहरात हॉटेल मधील फुडवेस्ट कचरा गोळा करणेसाठी वाहने कार्यरत आहेत सादर वाहना मार्फत दररोज फुडवेस्ट गोळा करणे करण्यात येते.
13. शहरातील भाजी मडंई मध्ये दैनांदिन निर्माण होणारा कचरा स्वतंत्रपणे गोळा करणेत येतो.

**कामकाजाचे सोईनुसार ८ प्रशासकीय प्रभाग आहेत.**

आरोग्याचे कामकाजाचे सोईनुसार प्रत्येक प्रशासकीय प्रभागात  सहाय्यक आरोग्यधिकारी, मुख्य आरोग्य निरीक्षक, आरोग्य निरीक्षक, मलेरिया इन्स्पेक्टर, आरोग्य सहाय्यक, आरोग्य मुकादम, सफाई कर्मचारी, सफाई सेवक, गटर कुली, कचरी कुली, स्प्रे कुली, मजुर, झाडुवाले कार्यरत आहेत.

याशिवाय कामाचे क्षेत्राप्रमाणे मनपा चे उपलब्ध असणारे कर्मचारी अपूरे असल्याने शासनाकडील परिपत्रक आदेशानुसार स्थानिक स्वंय रोजगार सेवा सहकारी संस्था यांचेकडील परिसरतील रस्ते,गटर्स,साफ करणे कामासाठी घंटागाडी कर्मचारी, कचरा वाहतूक कामगार कार्यरत आहेत.

मनपा परिसरतील सार्वजनिक संडास  सीट सफाई कामी संस्थांना अनुदान तत्वावर साफसफाईची कामे देण्यात आलेली आहेत.

मनपा परिसरा मधील  रहिवाशी कुटुंब व लहान मोठे व्यवसायिक आहेत. त्यांचे कडील दैनांदिन निर्माण होणारा कचरा, मनपाचे छोटे वाहना मार्फत कचरा गोळा करण्याचे कामकाज नियमीत करण्यात येते. छोटे वाहना मार्फत गोळा केलेला कचरा - संकलीत करण्यासाठी मनपा परिसरात कचरा कुडंया ठेवण्यात आल्या आहेत. सदर कचरा कुडंयात संकलीत केलेला कचरा उचलणे, वाहतूक करण्यासाठी  कॉम्फॅक्टर, डंपर प्लेसर, ट्रक व खाजगी ठेकेदाराचे  ट्रक वाहने कार्यरत आहेत.